**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०६ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **परीक्षेच्या काळात तणावातून मुक्त राहण्यासाठी 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.**
2. **विरोधकांच्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब.**
3. **नागपुरात महापौरपदी भाजपच्या नीता ठाकरे, तर अमरावतीत श्रीचंद तेजवानी यांची निवड.**
4. **ॲडव्हांटेज विदर्भ - खासदार औद्योगिक महोत्सवात पहिल्याच दिवशी 4 सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या.**
5. **गडचिरोली जिल्हयातल्या नक्षलवादी कारवाईत ३ नक्षलवादी ठार; जवान दीपक मडावी शहीद.**

**आता सविस्तर बातम्या** .......

परीक्षा पे चर्चा

प्रत्येक विद्यार्थ्यानं आपल्या स्वतःच्या अध्ययन शैलीवर विश्वास ठेवावा असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पंतप्रधानांनी आज 'परीक्षा पे चर्चा' या संवादात्मक कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि परीक्षेच्या काळात तणावातून मुक्त राहण्यासाठी मार्गदर्शन केलं. या कार्यक्रमाचं हे नववं वर्ष होतं. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या गतीबद्दल संवेदनशील राहावं, असं मोदी म्हणाले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांपेक्षा फक्त एक पायरी वर असावं ज्यामुळे मार्गदर्शन करणं सोपं जाईल आणि ते भीतीदायक वाटणार नाही, असं त्यांनी सुचवलं. जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये संतुलन आवश्यक आहे. गुण किंवा कौशल्यं यापैकी कोणत्याही एका बाजूकडे जास्त झुकल्यानं असंतुलन निर्माण होऊ शकतं. योग्य अभ्यास, निरीक्षण आणि ज्ञानाचा वापर केल्याशिवाय कोणतंही कौशल्य मिळवता येत नाही यावर त्यांनी भर दिला.

संसद कामकाज

विरोधकांच्या गदारोळामुळे आजही लोकसभेचं कामकाज आधी दुपारी १२ पर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. कामकाजाला सुरुवात होताच विरोधी पक्षांच्या सदस्यांनी हातात फलक घेऊन हौद्यात उतरून घोषणाबाजी करायला सुरुवात केली. गदारोळ सुरूच राहिल्यानं अवघ्या ४ मिनिटांत त्यांनी कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब केलं. कामकाजाला

पुन्हा सुरूवात झाल्यानंतरही विरोधकांनी घोषणाबाजी सुरू केली. गदारोळातच कागदपत्रं सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली. अध्यक्षांनी पुन्हा विरोधकांना जागेवर जाऊन बसायची विनंती केली, पण गोंधळ सुरूच राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. दरम्यान, अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत देशभरातल्या १७० रेल्वे स्थानकांच्या पुनर्निर्माणाचं काम पूर्ण झाल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी राज्यभेत प्रश्नोत्तराच्या तासाला पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. या योजनेअंतर्गत १ हजार ३०० रेल्वेस्थानकांचा कायापालट होणार असल्याचंही ते म्हणाले.

महापौर

नागपूरच्या महापौरपदी भाजपच्या  नीता ठाकरे यांची निवड झाली आहे. महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांची पहिली विशेष सभा आज सकाळी  रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृह येथे पार पडली. महापौरपदाच्या निवडणुकीत नीता ठाकरे यांना १०४ मते मिळाली, तर काँग्रेसच्या स्नेहल ठाकरे यांना 36 मते पडली. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना - शिंदे गटा कडून प्रत्येकी एक मत भाजपकडे गेले, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची  दोन्ही मते काँग्रेसला मिळाली. बसपा, एमआयएम आणि मुस्लिम लीगचे 11 सदस्य तटस्थ राहिले. उपमहापौरपदाच्या निवडणुकीत लीला हाथीबेड यांना 104 मते मिळाली, तर काँग्रेसच्या विवेक निकोसे यांना 36 मते पडली. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर पीठासीन अधिकारी म्हणून उपस्थित होते. विशेष सभेत उमेदवारी अर्जांची छाननी करून, उमेदवारी मागे घेण्यासाठी 15 मिनिटांचा कालावधी दिल्यानंतर निवडणूक पार पडली. नीता ठाकरे या  2002, 2007, आणि 2012 मध्ये नगरसेविका म्हणून निवडून आल्या होत्या. तर 2०17 मधील निवडणुकीत त्यांना पराभव पत्करावा लागला. त्या भाजपच्या पदाधिकारी आणि महिला आयोगाच्या सदस्य राहिल्या आहेत.

अमरावती महापौर

अमरावती महानगरपालिकेच्या महापौर आणि  उपमहापौर पदासाठी निवडणूक आज  पार पडली. यामध्ये नवनिर्वाचित सर्व सदस्यांनी भाग घेतला. यात भारतीय जनता पक्षाचे श्रीचंद तेजवानी यांनी 55 मते घेऊन महापौर पदी विजय मिळविला. तर युवा स्वाभिमान पक्षाचे नगरसेवक सचिन भेंडे  55 मते घेऊन उपमहापौर पदी विराजमान झाले. जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि  मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कार्यवाही केली. महापौर पदासाठी काँग्रेसचे उमेदवार संजय शिरभाते यांना 16 तर बहुजन समाज पक्षाचे उमेदवार इस्माईल लालूवाले यांना 3 मते मिळाली.

एडवांटेज विदर्भ 2026

विदर्भातील नक्षल प्रभावित गडचिरोली जिल्ह्याची ओळख ग्रीन स्टील हब ऑफ इंडिया अशी तयार करणार असून, गडचिरोलीमध्ये स्टील विषयक इकोसिस्टीम तयार करून चीनपेक्षा कमी दराचे स्टील संपूर्ण जगाला उपलब्ध करून देऊ, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसरात आयोजित एडवांटेज विदर्भ 2026 खासदार औद्योगिक महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात ते उपस्थित लोकांना संबोधित करत होते. राज्यात वेगवेगळे मॅगनेट तयार करून त्या शेजारचे जिल्हे विकसित करण्याचा उद्देश आहे, असं त्यांनी सांगितलं. सोलर मॉडयूल मध्ये देशातली सर्वात मोठी इकोसिस्टीम नागपुरात तयार होत असून एक लाख रोजगार निर्मिती या माध्यमान होणार आहे, असं त्यांनी म्हंटल. अमरावती इथल्या यशस्वी इंटिग्रेटेड टेक्स्टाईल पार्क च्या धरतीवर दुसरा पार्क पीएम मित्रा योजने अंतर्गत तयार होणार असून अमरावती एअरपोर्ट नजीक एव्हिएशन स्कूल तयार होत आहे. यामुळे यवतमाळ, बुलढाणा, वाशीम आणि अकोला जिल्ह्याला मोठ्या प्रमाणावर लाभ होईल असं फडणवीस म्हणाले. खासदार औद्योगिक महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी चार महत्त्वपूर्ण सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यातला पहिला करार ‘सुपर स्मेलटर्स लिमिटेड’ यांचा असून ते पोलाद उद्योगात दहा हजार कोटींची गुंतवणूक करणार आहे. याचा लाभ गडचिरोलीसह, वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यांना देखील होईल. महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड आगामी दहा वर्षात 15 हजार कोटींची गुंतवणूक करणार असून नागपूर मध्ये ऑटोमोबाईल, इलेक्ट्रिक आणि ट्रॅक्टर यासाठी इंटिग्रेटेड हब तयार करणार आहे. याशिवाय एन-मोटिव इंडिया आणि जीआयबीसी आणि एआयडी दरम्यान करार करण्यात आले.

विदर्भात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होऊन उद्योग येऊ घातले असताना या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर उद्योगांना लागणाऱ्या कौशल्य युक्त मनुष्यबळाची आवश्यकता असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. याशिवाय विदर्भ क्षेत्राच्या एकंदर विकासासाठी आणि गरिबी निर्मूलनासाठी उद्योग धंद्यांच्या वाढीच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला.

नक्षल शाहिद

छत्तीसगड राज्य आणि भामरागड तालुक्यातील सीमावर्ती भाग असलेल्या फोदेवाडा गावानजीकच्या जंगलात पोलिस आणि नक्षल्यांमध्ये तीन दिवसांपासून सुरु असलेल्या चकमकीत आतापर्यंत तीन नक्षलवादी ठार झाले आहेत. या चकमकीत ‘जवान दीपक मडावी’ शहीद झाले असून, ‘जवान जोगा मडावी’ जखमी झाले आहेत. दरम्यान ‘शहीद जवान दीपक मडावी’ यांच्या पार्थिवाला आज दुपारी गडचिरोली येथील पोलिस मुख्यालयाच्या पटांगणावर मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी नागपूरचे पोलिस आयुक्त डॉ.रवींद्र सिंगल, उपमहानिरीक्षक अंकित गोयल, पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दीपक यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

गव्हर्नर संजय मल्होत्रा

अवैध इलेक्ट्रॉनिक बँकिंग व्यवहारांमुळं ग्राहकांना होणाऱ्या नुकसानीवर मर्यादा आणण्यासाठी दिशानिर्देशांचा मसुदा रिझर्व्ह बँक जाहीर करणार आहे. त्यानुसार छोट्या रकमेच्या नुकसानीसाठी ग्राहकांना २५ हजार रुपयांपर्यंत नुकसान भरपाई देण्याचा प्रस्ताव आहे. ही नुकसान भरपाई प्रत्येक ग्राहकाला एकदाच दिली जाईल. याबद्दलचे तपशील लवकरच दिले जातील, अशी माहिती गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली.

क्रिकेट

१९ वर्षांखालच्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारत आणि इंग्लंड यांच्यात हरारे मध्ये सामना सुरू आहे. या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. भारतान विजयासाठी इंग्लंडपुढं ४१२ धावांचं लक्ष ठेवलं आहे. सलामीवीर एरॉन जॉर्ज ९ धावांवर बाद झाल्यानंतर वैभव सूर्यवंशी आणि आयुष म्हात्रेनं डाव सावरला. सुर्यवंशीनं ५५ चेंडूंमध्ये शतक झळकावत एकूण १७५ धावा केल्या. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या ४ षटकांत १४ धावा झाल्या होत्या.

*****